**आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००१.

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ६३

दिनांक - ३० /०९/२०२५ वेळ :- सकाळी १०.०० वाजता

| अ.क्र | विषय क्र | विषय |
|---|---|---|
| १ | ६०० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० अंतर्गत मंजूर घनकचरा व्यवस्थावन प्रकल्पास मान्यता मिळणे बाबत. |
| २ | ६०१ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान, माझी वसुंधरा,सफाई मित्र सुरक्षा अभियान तसेच पेयजल योजनेसाठी विविध दस्ताऐवज तयार करणे व विविध समाज माध्यमातून प्रसिध्दी करणेकामी नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्था मे यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी.मालेगांव या संस्थेस एक वर्षाकरीता मुदतवाढ देणे बाबत. |
| ३ | ६०२ | रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.१ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७४-१ निविदेच्या मान्यते बाबत. |
| ४ | ६०३ | रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.४ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८८८-१ निविदेच्या मान्यते बाबत. |
| ५ | ६०४ | दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करणेकामी दुस-या संस्थेकडून कामकाज करून घेणे बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६३**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०० विषय क्र - ६००
दिनांक :-३० /०९/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन

---

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० अंतर्गत मंजूर घनकचरा व्यवस्थावन प्रकल्पास मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, मा.अभियान संचालक यांचे प्राप्त ई - मेल नुसार अहिल्यानगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता स्वच्छ भारत अभियान २.०(ना) करिता रक्कम रू.१०,९३,१७,०००/- निधी मंजूर करून सदर निधी विनियोग करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून मा.शासनाची मंजूरी घेणेबाबत निर्देशीत केलेले होते. त्यानुसार मा.अभियान संचालक यांचेकडील कार्यालयाने नामनिर्देशीत केलेल्या संस्थांकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणेबाबत निर्देशीत केलेले आहे. त्याप्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेने ऑल इंडिया इन्टिटयुट ऑफ लोकल सेल्प गर्वन्मेंट,पुणे या संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात आलेला असून सदर अहवालाची प्रत मनपास प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकल्प अहवाल हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नाशिक यांचेकडेस सादर केला असता ाहाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नाशिक यांनी रक्कम रू.१०,०९,४४,४७७/- रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून सदरचा अहवाल मा.शासनाच्या प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविला असता सदर प्रकल्प अहवालास मा.शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तथापी,सदर प्रकल्प अहवालामध्ये मनपा मार्फत १५ मे.टन प्रति तास क्षमतेचे २ shredde मशीन प्रस्तावीत करण्यात आलेल होते. परंतु सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणा-या ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गर्वरमेंट,पुणे या संस्थेने सदर बाबत पूर्तता न केल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नाशिक यांनी १० मे.टन प्रति दिन क्षमतेचा shredde मशीनच्या अहवालास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर मशीन खरेदी न करता मनपा मार्फत १५ मे.टन प्रति तास क्षमतेचे २ shredde मशिनकरिता स्वतंत्र पिंपरी चिंचवड,महानगरपालिकेकडून तांत्रिक मंजुरी घेवून त्यास मा.शासनाची स्वतंत्र्य मान्यता घेण्यात येणार आहे. त्यामुळे मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालातील रू.४७,४७,५३४/- वजा जाता उर्वरीत रू.९,६१,९६,९४२.९० च्या खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात येत आहे.

| sr | particulars | Unit | Existing Capacity available | proposed Capacity SBM2.0 | Proposed Amount in Rs in SBM 2.0 |
|---|---|---|---|---|---|
| A | Compost Plant (Including leachate Management) | TPD | 80 | | |
| ]1 | Civil works | | | | |
| | Monsoon shed on existing windrow platform (68m x40m) | | 0 | 2720.00 | 3,63,87,994. 97 |
| | Monsoon Shed on existing Tipping Platform (70m x42m) | | 0 | 2940.00 | 3,95,98,095. 22 |
| 2 | plant & Machinery | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Biomass Briquetting Plant (10 TPD) | Nos | 0 | 1 | 21,75,000. 00 |
| | plasic Dust Remover{5 TPD} | Nos | 0 | 1 | ]5,50,847. 00 |
| | Sub- Total of A { A1+A2} | | | | 7,87,11,937. 19 |
| B | Total Project basic cost{A} | | | | 7,87,11,937. 19 |
| C | Mjp fees {1% of B] inclusive of GST } | | | | 8,27,352. 71 |
| D | PMC Fees Of 2.55% Of B} { 18% on D} | | | | 21,09,749. 41 |
| E | GST | | | | |
| 1 | Cvil Work {A1} | | | | 1,36,77,496. 23 |
| 2 | plant & Machinery | | | | 4,90,652. 46 |
| 3 | PMC Fees { 18% on D} | | | | 3,79,754. 89 |
| F | Total GST{E1+E2+E3} | | | | 1,45,47,903. 6 |
| TC-1 | Total Project Cost of Solid Waste Management { B+C+D+F } | | | | 9,61,96,942. 90 |

वरील प्रमाणे प्रस्तावात दर्शविलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी करणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -६३**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०१ — विषय क्र - ६०१

दिनांक :-३० /०९/२०२५ — विभाग- घनकचरा व्यवस्थापन

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान, माझी वसुंधरा,सफाई मित्र सुरक्षा अभियान तसेच पेयजल योजनेसाठी विविध दस्ताऐवज तयार करणे व विविध समाज माध्यमातून प्रसिध्दी करणेकामी नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्था मे यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी.मालेगांव या संस्थेस एक वर्षाकरीता मुदतवाढ देणे बाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा ,सफाई मित्र सुरक्षा अभियान तसेच पेयजल योजनेसाठी विविध दस्ताऐवज तयार करणे व कलेल्या कामांची विविध समाज माध्यमातुन प्रसिध्दी देणेकामी प्रकल्प व्यवस्थापन युनिट (Project management Unit ) म्हणून त्रयस्थ संस्थेची नेमणूक ही मा.शासनाच्या GeMपोर्टलवर निविदा क्र. GeM/२०२४/B/५२५८४९५ राबविण्यात येवून लघुत्तम दर असणा-या मे.यंगार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी. मालेगांव या संस्थेचे दर लघुत्तम दर असणा-या संस्थेच दर मा.स्थायी समिती ठराव क्र.२९४ दि.११/१०/२०२४ रोजीच्या ठरावानुसार रक्कम रू.३९,५५,०००/- च्या खर्चास मंजूरी घेवून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सदर संस्थेने दि.१४/१०/२०२४ पासून कामकाज करणेस सुरूवात केलेली आहे.

कार्यारंभ आदेशाप्रमाणे सदर संस्थेची मुदत दि.१३/१०/२०२५ रोजी संपुष्टात येत असून मे.यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी. मालेगांव या संस्थेने मंजूर दराप्रमाणे पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देणे बाबत विनंती पत्र सादर केलेले आहे. सदर संस्थेचा मागील एक वर्षातील कामाचा आढावा घेतला असता सदर संस्थेच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेस स्वच्छ भारत अभियान अंतर्गत थ्री स्टार कचरा मुक्त शहराचे मानांकन व वॉटरप्लस दर्जाचे उच्चतम प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदर संस्थेने व्यवस्थितरित्या व समाधानकारकपणे काम केलेले आहे.

आगामी कालावधीमध्ये होणा-या स्वच्छ भारत अभियान (ना) २.० माझी वसुंधरा ६.० तसेच मा.शासनाकाडील वेळोवेळी प्राप्त होणा-या विविध स्वच्छतेविषयक कामामध्ये महानगरपालिकेस उच्चतम कामगिरी करणेकामी सदर संस्थेची आवश्यकता आहे.

उपरोक्त प्रमाणे सदर संस्थेच्या विनंती पत्राप्रमाणे मे.यंगमार्वल सर्व्हिसेस एल.एल.पी.मालेगांव संस्थेस केलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीस अधिन राहून दि.१४/१०/२०२५ ते दि.१३/१०/२०२६ अखेर मुदतवाढ देणेस व सदर कामाकरीता रू.३९,५५,०००/- च्या खर्चास तसेच सदरचा खर्च प्रोत्साहनात्मक अनुदानाच्या प्राप्त निधीमधून करणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६३**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०२ विषय क्र - ६०२

दिनांक :-३० /०९/२०२५ विभाग- मार्केट विभाग

---

**विषय :-** रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.१ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७४-१ निविदेच्या मान्यते बाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करिता प्रभाग निहाय खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्रभाग समिती क्र.१ साठी ई निविदा क्र २०२५ANMC-१२०३८७४-१ निविदा सुचना क्र.९ मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली होती. त्याची मुदत दि.२४/०७/२०२५ ते ०८/०८/२०२५ अशी होती. सदर निविदेचा ट्राकिंग शॉर्ट पाहता दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक २४/०७/२०२५ ते १८/०८/२०२५ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढीची मुदत संपलेली असून त्याचा तांत्रिक लिफाफा उघडला असता १)मे.वंशिका एंन्टरप्रायजेस,भिंगार,अहिल्यानगर व २) मे.ऍक्सीम पेस्ट कंन्ट्रोल नाशिक यांची निविदा प्राप्त झालेली आहे.सदर निविदेबाबत छाननी समितीची दिनांक ०२/०९/२०२५ रोजी झालेली आहे. छाननी समितीमध्ये निविदाधारक यांचे कागदपत्र यथायोग्य असल्याने वरील दोन्ही निविदा हया पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक १७/०९/२०२५ रोजी निविदा उघडली असता खालील प्रमाणे एक वर्षाकरीता देकार रक्कम देण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **मनपाने निश्‍चित केलेली देकार रक्कम** | **ठेकेदाराने निविदेमध्ये नमूद केलेली देकार रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | मे.वंशिका एंटरप्रायजेस भिंगार,अहिल्यानगर | ४,२०,०००/-+१८% GST | ४,३१,०००/- |
| २ | मे.ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक | ४,२०,०००/-+१८% GST | ४,२५,०००/- |

तरी प्रभाग समिती क्र.१ करिता ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८७४-१ १) मे वंशिका एन्टरप्रायजेस ,भिंगार,अहिल्यानगर यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ४,३१,०००/- व २) मे ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ४,२५,०००/- नमुद केलेले आहे.परंतु मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांनी १८% GST चा उल्लेख केलेला नसल्याने मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांना पत्र देण्यात आलेले आहे. तसेच वाटाघाटी करणेसाठी बोलविण्यात आले असता ठेकेदाराने निविदा प्रसिध्द करताना आपण निविदेची रक्कम निश्चित केलेली असल्याने त्यानुसार आम्ही देकार रक्कम दिलेली आहे. त्यामुळे कोणतीही रक्कम वाढवून दिलेली नाही. तसेच मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांनी देकार रक्कम रू.४,३१,०००/- + १८% GST लावून म्हणजे रू.५,०८,५८०/- इतकी रक्कम पत्रामध्ये नमुद केलेली आहे.

तरी मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांची देकार रक्कम जास्त असल्याने प्रभाग समिती क्र.१ साठी ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८७४-१ निविदा सुचना क्र.११ चा ठेका देकार रक्कम रू.४,३१,०००/- + १८% GST लावून म्हणजे रू.५,०८,५८०/- इतकी रकमेस निविदेमधील नमुद अटी - शर्तीनुसार एक वर्षासाठी देणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६३**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०३ — विषय क्र - ६०३

दिनांक :-३० /०९/२०२५ — विभाग- मार्केट विभाग

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय :-** रस्ता बाजु मांडणी फि व स्लॉटर फी प्रभाग समिती क्र.४ करीता नव्याने फेर ई - निविदा क्र २०२५ANMC-१२०३८८८-१ निविदेच्या मान्यते बाबत.

**--**--**

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करिता प्रभाग निहाय खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेकामी ऑनलाईन पध्दतीने प्रभाग समिती क्र.४ साठी ई निविदा क्र २०२५ANMC-१२०३८८८-१ निविदा सुचना क्र.११ मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली होती. त्याची मुदत दि.२४/०७/२०२५ ते ०८/०८/२०२५ अशी होती. सदर निविदेचा ट्रॅकिंग शॉर्ट पाहता दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक २४/०७/२०२५ ते १८/०८/२०२५ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढीची मुदत संपलेली असून त्याचा तांत्रिक लिफाफा उघडला असता १)मे.वंशिका एंन्टरप्रायजेस,भिंगार,अहिल्यानगर व २) मे.ऍक्सीम पेस्ट कंन्ट्रोल नाशिक यांची निविदा प्राप्त झालेली आहे.सदर निविदेबाबत छाननी समितीची दिनांक ०२/०९/२०२५ रोजी झालेली आहे. छाननी समितीमध्ये निविदाधारक यांचे कागदपत्र यथायोग्य असल्याने वरील दोन्ही निविदा हया पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक १७/०९/२०२५ रोजी निविदा उघडली असता खालील प्रमाणे एक वर्षाकरीता देकार रक्कम देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | मनपाने निश्चित केलेली देकार रक्कम | ठेकेदाराने निविदेमध्ये नमूद केलेली देकार रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.वंशिका एंटरप्रायजेस भिंगार,अहिल्यानगर | ४,२०,०००/-+१८% GST | ४,३१,०००/- |
| २ | मे.ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक | ४,२०,०००/-+१८% GST | ४,२५,०००/- |

तरी प्रभाग समिती क्र.१ करिता ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८८८-१ १) मे वंशिका एन्टरप्रायजेस ,भिंगार,अहिल्यानगर यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ४,३१,०००/- व २) मे ऍक्सीम पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी निविदेमध्ये देकार रक्कम रू. ४,२५,०००/- नमुद केलेले आहे.परंतु मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांनी १८% GST चा उल्लेख केलेला नसल्याने मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांना पत्र देण्यात आलेले आहे. तसेच वाटाघाटी करणेसाठी बोलविण्यात आले असता ठेकेदाराने निविदा प्रसिध्द करताना आपण निविदेची रक्कम निश्चित केलेली असल्याने त्यानुसार आम्ही देकार रक्कम दिलेली आहे. त्यामुळे कोणतीही रक्कम वाढवून दिलेली नाही. तसेच मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांनी देकार रक्कम रू.४,३१,०००/- + १८% GST लावून म्हणजे रू.५,०८,५८०/- इतकी रक्कम पत्रामध्ये नमुद केलेली आहे.

तरी मे.वंशिका एन्टरप्रायजेस यांची देकार रक्कम जास्त असल्याने प्रभाग समिती क्र.४ साठी ई निविदा क्र. २०२५ANMC-१२०३८८८-१ निविदा सुचना क्र.११ चा ठेका देकार रक्कम रू.४,३१,०००/- + १८% GST लावून म्हणजे रू.५,०८,५८०/- इतकी रकमेस निविदेमधील नमुद अटी - शर्तीनुसार एक वर्षासाठी देणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपलिका

सही/-
(यशवंत डांगे)
मा. प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -६३**

मा.प्रशासक ठराव क्र. ६०४ — विषय क्र - ६०४

दिनांक :- ३० /०९/२०२५ — विभाग- घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करणेकामी दुस-या संस्थेमार्फत झालेल्या कामास कार्योत्तर मंजूरी बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन निर्माण होणारा कचरा संकलन व वाहतून करणे कामी ई निविदा प्रक्रिया राबवून मे श्री.जी एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेस तीन वर्षाकरिता कार्यारंभ आदेश निर्ममीत करण्यात आलेले आहेत.

तथापी मे श्री.जी.एजन्सीज,अहमदाबाद यांचे कामाबाबत नागरिक व पदाधिकारी यांचे वारंवार प्राप्त होणा-या तक्रारीमुळे सदर संस्थेस अंतिम नोटिस बजावण्यात आलेली असून नोटीशीच्या अनुषंगाने खुलासा प्राप्त झाला असून सदर खुलासा अत्यंत मोघम स्वरूपाचा असून वस्तूस्थितीशी विसंगत व असमाधानकारक असल्यामुळे मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मे.श्री.जी.एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेकडून काम करून घेणे बाबत नमुद केले आहे.

तथापि सदर मे.श्री.जी एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेच्या कामामध्ये अनियमीतता असल्यान्र मनपा मार्फत नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून ई - निविदा प्रक्रिया पूर्ण होणेस कालावधी लागणार आहे. तोपर्यत काम बंद ठेवल्यास शहरामध्ये मोठया प्रमाणामध्ये कचरा साचून आरोग्य विषयक समस्या निर्माण होतील त्यामुळे सदरची बाब अत्यावश्यक व नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्यामुळे मे.साईराज अर्थमुव्हर्स, अहिल्यानगर या संस्थेशी झालेल्या तोंडी चर्चेनुसार विचारणा केली असता सहमती दर्शलिली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन निर्माण होणारा कचरा संकलन व वाहतूक करणे या कामी स्थायी समिती सभा कार्यसुची क्र.५७ विषय क्रमांक ५५४ ,ठराव क्र.५५४ दिनांक १८/०८/२०२५ पासुन मे.साईराज अर्थमुव्हर्स,अहिल्यानगर यांना ई - निविदा अंतिम होवून नविन संस्थेस कार्यारंभ आदेश निर्गमीत होईपर्यत मा.प्रशासक यांनी मान्यता दिलेली आहे.

तथापी मे.साईराज अर्थमुव्हर्स या संस्थेस मागील श्रीजी एजन्सीज,अहमदाबाद यांचेशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती व दरास अधिन राहून सदर संस्थेने मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मौखीक आदेशानुसार दि.२७/०६/२०२५ पासून त्यांची स्वत:ची यंत्रणा वापरून

दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेचे कामास सुरूवात केलेली असल्यामुळे दिनांक २७/०६/२०२५ ते दिनांक १८/०८/२०२५ पर्यत केलेल्या कामास व या कामापोटी झालेल्या खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मान्यता देणेत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | मा. प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपलिका | अहिल्यानगर महानगरपालिका |